सन २०२६-२७ करीता मिशन वात्सल्य या केंद्रपुरस्कृत योजनेअंतर्गत निधी वितरीत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- वात्सल्य-२०२६/प्र.क्र.८८/का-०८**
नविन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक-२० मे २०२६

**वाचा :-**

१. केंद्र शासनाचे पत्र क्र. No.CW-II-२/२०२६-CW-II (e-१४४९८७) दि.१०.४.२०२६
२. केंद्र शासनाचे पत्र क्र. No.CW-II-३/२०२६-CW-II (e-१४४९८९) दि.१३.४.२०२६
३. केंद्र शासनाचे पत्र क्र. No.CW-II-४/२०२६-CW-II (e-१४४९९०) दि.१०.४.२०२६
४. वित्त विभाग परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५१/कोषा.प्रशा-४ दि.३०.७.२०२५
५. वित्त विभाग परिपत्रक क्र. अर्थसं-२०५/प्र.क्र.४४/अर्थ-३ दि. ७.४.२०२५

**प्रस्तावना :-**

केंद्र पुरस्कृत मिशन वात्सल्य योजनेअंतर्गत सन २०२६-२७ करीता केंद्र शासनाने संदर्भ क्र. १ ते ३ वरील पत्रान्वये पुढीलप्रमाणे (Mother Sanction) मातृ मंजूरी दिलेली आहे.

रु. लक्ष

| अ.क्र. | योजना | मंजूरी दिलेला निधी |
|---|---|---|
| १ | मिशन वात्सल्य सर्वसाधारण | २९०.०८ |
| २ | चाईल्ड हेल्पलाईन | ४७.१३ |
| ३ | स्वच्छता ॲक्शन प्लॅन | ३.२१ |

केंद्र शासन व राज्य शासन या दोन्ही स्तरावरील रोख व्यवस्थापनामध्ये (Cash Management) अधिक परिणामकारकता साध्य करण्यासाठी केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी वितरीत करण्यासाठी SNA SPARSH ही पर्यायी निधी प्रवाही कार्यपध्दती लागू करण्याचा केंद्र शासनाने निर्णय घेतला असून उपरोक्तप्रमाणे केंद्र शासनाने मिशन वात्सल्य योजनेअंतर्गत वितरीत केलेला निधी आयुक्त महिला व बाल विकास यांना SNA SPARSH प्रणालीद्वारे वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

केंद्र शासनाने सन २०२६-२७ मध्ये मिशन वात्सल्य या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत मातृ मंजूरी दिलेल्या योजनेकरीता केंद्र हिस्सा व त्यास समरुप राज्य हिस्सा व चाईल्ड हेल्पलाईन करीता १०० टक्के केंद्र हिस्सा निधी असा एकुण रु. ४८०.९४ लक्ष (रुपये चार कोटी ऐंशी लाख चौऱ्याण्णव हजार फक्त) एवढा निधी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पीत केलेल्या निधीमधून खालील रकाना क्र. २

येथील लेखाशीर्ष / उद्दिष्टांकरीता रकाना क्र. ४ येथे नमूद केल्यानुसार आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांना वितरीत व खर्च करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(रु. लाख)

| अ.क्र. | लेखाशिर्ष | अर्थसंकल्पीत निधी | प्रस्तावित वितरण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | मागणी क्र.एक्स-०१<br>२२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण,<br>१०२, बाल कल्याण, (१६) शासकीय संस्था,<br>(१६)(०१) एकात्मिक बाल सरंक्षण योजना<br>(२२३५ C००९), केंद्र हिस्सा, ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) | २७३६.०५ | २९०.०८ |
| २ | मागणी क्र.एक्स-०१<br>२२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण,<br>१०२, बाल कल्याण, (१६) शासकीय संस्था,<br>(१६) (०२) एकात्मिक बाल संरक्षण योजना<br>(२२३५ C०१८), राज्य हिस्सा, ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) | १२५०.२४ | १३८.३८ |
| ३ | (२०)मिशन वात्सल्य (२०) (०५) स्वच्छता ॲक्शन प्लॅन (एसएपी) (केंद्र हिस्सा ६०%) (००३५ डी ४४४) | १२०.०० | ३.२१ |
| ४ | (२०)मिशन वात्सल्य (२०) (०५) स्वच्छता ॲक्शन प्लॅन (एसएपी) (राज्य हिस्सा ४०%) (००३५ डी ४५३) | ८०.०० | २.१४ |
| **५** | मागणी क्र. एक्स -०१ २२३५ - सामाजिक सुरक्षा व कल्याण, (०२) समाजकल्याण (१०२) बालकल्याण, (२०) मिशन वात्सल्य, (२०)(०७) चाईल्ड हेल्पलाईन (२२३५ डी४६२) (केंद्र १००%) ३१, सहायक अनुदान (वेतनेत्तर) | १३७३.४० | ४७.१३ |
| | **एकुण** | **५५५९.६९** | **४८०.९४** |

२. वरीलप्रमाणे उपलब्ध निधी रु. ४८०.९४ लक्ष वितरणाकरिता आयुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच लेखाधिकारी, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांना “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर निधी आहरण व विनियोगाच्या अनुषंगाने केंद्र शासन व राज्यशासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचना, वित्त विभागाचे निर्देश यांचे अनुपालन होईल याची दक्षता नियंत्रक अधिकारी व आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

४.	सदर शासन निर्णय वित्त विभगाच्या संदर्भ क्र. ४ दि. ३०.७.२०२५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये दिलेल्या सुचनांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५.	मिशन वात्सल्या योजनेअंतर्गतचा निधी SNA SPARSH प्रणालीद्वारे RBI च्या E-Kuber मार्फत वितरीत करावयाचा असल्याने सदरचे अनुदान बिनशर्त आहे.

६.	हा शासन निर्णय वित्त विभाग, अनौपचारिक संदर्भ क्र.१८७/व्यय-६, दि.८.५.२०२६ अन्वये त्या विभागाने दिलेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

६.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०५२०१११८१८१२३० असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NILESH JANARDAN PATIL

Digitally signed by NILESH JANARDAN PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=b7f57a5d2af23fdb37cfec3c30cfe085ddbef06ea381e7e81401a472bbb966f7, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B7D8429F943427129A6A081EE223FEAC961CDD926C4D3542C55A470F22A7C7AE, cn=NILESH JANARDAN PATIL
Date: 2026.05.20 13:03:58 +05'30'

**( डॉ.निलेश ज.पाटील )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष/ सदस्य, विधानसभा/ विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. मा.मंत्री/ राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांची खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांचे उपसचिव,मंत्रालय,मुंबई
७. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे
१०.महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
११.महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर
१२.सर्व उपसचिव, सर्व अवर सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.उपायुक्त (बाल विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय,पुणे
१४.कार्यक्रम व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण सोसायटी, पुणे.
१५.कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सदर निधी बी.डी.एस. प्रणालीवर वितरीत करण्याच्या विनंतीसह अग्रेषित.
१६.सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
१७.सर्व कार्यासने, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. निवड नस्ती, का-०८.